## मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नविन अधिकृत शिधावाटप दुकान(रेशन शॉप) उघडण्यासाठी जाहिरात

शासनामार्फत मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रात अतिरीक्त एकांक असलेल्या तसेच बंद दुकानाच्या विभागासाठी **एकुण ३४७** ठिकाणी नविन शिधावाटप दुकान मंजुर करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. इच्छुक स्वयंसहाय्यता गट यांचेकडून त्यासाठी खालील अटींवर अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. अर्जदाराच्या प्रस्तावित दुकानाची जागा किमान १०० चौ.फू.(९.२९१ चौ.मि.) क्षेत्रफळाची व विभागासाठी घोषित केलेल्या चतु:सिमेत असावी.

२. प्रस्तावित जागा व्यावसायीक असावी असे बंधनकारक नाही. निवासी जागेतही शिधावाटप दुकान मंजूरीचा विचार होईल, मात्र ती पक्क्या बांधकामाची आणि अर्ज सादर करते वेळी अधिकृतरित्या अर्जदाराच्या प्रत्यक्षात ताब्यात असली पाहीजे. तसेच संबधित गृह निर्माण संस्था अगर तत्सम प्राधिकारणाचे निवासी जागेतील शिधावाटप दुकानासाठी नाहरकत पत्र सादर करावयास हवे.

३. जागेचे करारपत्र, सत्य प्रतिज्ञापत्र यासारखे तत्सम कागदपत्रे नोटरीकृत असावेत. ज्या अर्जदारास दुकान मंजूर होईल त्यास जागेचे करारपत्र नोंदणीकृत (Registered) करुन सादर करावे लागेल. अर्जासमवेत पुरावादर्शक सादर करावयाची सर्व कागदपत्रं तसेच काही फेरफार करणे आवश्यक असल्यास असे फेरफार हे अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच स्विकारले जातील (जाहिरात वर्तमापन पत्रातून प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत) त्यानंतर असे कोणतेही फेरफार करता येणार नाहीत किंवा सुधारीत कागदपत्रं स्विकारले जाणार नाहीत व ग्राहय धरले जाणार नाहीत.

४. दुकानाची जागा विभागातील शिधापत्रिकाधारकांना व वाहतुकीच्या दृष्टिने सोयीची असली पाहिजे. तसेच दुकानाच्या दर्शनी भागाची रुंदी व उंची किमान ८ फूटापेक्षा कमी नसावी. प्रस्तावित जागेचे बांधकाम अनधिकृत नसावे. दुकानासाठी प्रस्तावित केलेली जागा अनधिकृत असल्याचे कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी ठोस दिसून आल्यास संबंधित अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.

५. या जाहिरातीद्वारे दुकान मंजूर होणाऱ्या आवेदकास दुकानासाठी दर्शविलेल्या जागेसंबंधी / बांधकामाच्या वैधतेसंबंधी / इतर तत्सम बार्बीसंबधी कोणत्याही स्थानिक प्राधिकारणाच्या नियमांचा / केंद्र शासनाच्या कायद्यांचा भंग झाल्यास दुकान विनाविलंब/विनानोटीस रद्द करण्यात येईल असे शपथपत्र देणे आवश्यक आहे. तसेच दुकान मंजूर करण्यापूर्वी ही अट मान्य असल्याचे शपथपत्र ही त्यास द्यावे लागेल किंवा स्थानिक प्राधिकारणाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल.

६. स्वयंसहाय्यता गटाच्या नावे बँकेत खाते असणे व त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक असून अर्जदाराकडे खेळते भांडवल किमान रु.५०,०००/- असावे. आर्थिक स्थितीची पुरावादर्शक कागदपत्रे उदा. बँक खाते, पतपेढीचे हमीपत्र इत्यादी जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वीची असावी. वैयक्तिक हमीपत्र आर्थिक स्थितीचा पुरावा म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.

७. स्वयंसहाय्यता गटाच्या मान्यतेबाबतचे संबंधित प्राधिकरणाचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. स्वयंसहाय्यता गटाचा कमीत कमी १ वर्षापूर्वीचा लेखा परिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

९. स्वयंसहाय्यता गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या नेमणूकीबाबतच्या ठरावाची प्रत तसेच बचत गटाच्या सदस्यांची यादी पदाधिकाऱ्यांचे नाव पत्त्यासह देणे आवश्यक आहे.

१०. ज्या स्वयंसहाय्यता बचत गटाच्या नावे शिधावाटप दुकान कार्यरत आहे, ते बचत गट आणखी एक शिधावाटप दुकान मिळण्यास पात्र नसल्याने अशा बचत गटांनी आवेदनपत्र सादर करु नयेत. तसेच ज्या स्वयंसहाय्यता गटाचे दुकान गैर व्यवहारामुळे निलंबित / रद्द करण्यात आले असेल अशा स्वयंसहाय्यता गटांनी नविन दुकानासाठी आवेदनपत्रे सादर करु नयेत.

११. उपरोक्त अटींबाबतची पूर्तता करतेवेळी अर्जदाराने बनावट कागदपत्रं/खोटी माहिती सादर केली होती असे उघडकीस आल्यास त्यांचे दुकान विनानोटीस रद्द करण्यात येईल.

१२. स्वयंसहाय्यता गट तसेच गटाच्या सदस्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याबाबत व त्याचेविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ नुसार गुन्हा दाखल नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करावे.

१३.अर्ज सादर करतानाच अर्जासोबत दुकान मंजूरीच्या अटींची पूर्तता करणारी कागदपत्रं देणे बंधनकारक आहे.

वरील अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारानी विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित विभागीय परिमंडळ कार्यालयाकडून रु.५/-(रुपये पाच फक्त) भरुन प्राप्त करावे. अर्जदार स्वयंसहाय्यता गटाने आवेदनपत्रातील संपूर्ण तपशील अचूक भरावा व आवश्यक त्या पुरावादर्शक कागदपत्रांसह अर्ज दोन प्रतींमध्ये(एक फोटो प्रत) संबंधीत परिमंडळ कार्यालयात जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांचे आत सादर करावेत.

ज्या विभागात नव्याने शिधावाटप दुकाने उघडावयाची आहेत त्या विभागातील स्थानिक शिधावाटप कार्यालय क्रमांक, परिमंडळ कार्यालयाचा पत्ता व घोषित ठिकाणांची एकूण संख्या इत्यादींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागीय परिमंडळ | विभागीय परिमंडळ कार्यालयाचा पत्ता | स्थानिक शिधावाटप कार्यालय क्रमांक | घोषित ठिकाणांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | अ | पुरवठा भवन, ५ वा मजला, जनरल नागेश मार्ग, महात्मा गांधी रुग्णालयाजवळ (बैलघोडा), परळ, मुंबई-१२ दुरध्वनी क्रमांक २४१५७५७९, २४१५७५६० | १/अ, ३/अ, ५/अ, ६/अ, ९/अ, ११/अ, १३/अ, १५/अ १६/अ, १७/अ, १८/अ, १९/अ, २०/अ, २१/अ. | ११८ |
| २. | ड | गुरु नारायण रोड, नेहरु मार्ग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ५५ दु. क्र.२६१२३६१७ (शि.का.क्र.२३/ड) | २२/ड, २३/ड, २४/ड, २५/ड, २६/ड. | ५० |
| ३. | ई | १ ला मजला, चंचलस्मृति, ग.द.आंबेकर मार्ग, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, दू.क्र.२४१२५४९५, २४१२५३५२ | ३०/ई, ३१/ई, ३२/ई, ३३/ई, ३४/ई, ३५/ई, ४४/ई, ४५/ई. | ३८ |
| ४. | ग | कांदिवली हितवर्धक मंडळ, एस.व्ही.रोड, कांदिवली (प). दु.क्र.२८०७०११५४, २८०७०१२३ | २७/ग, २८/ग, ४२/ग, ४३/ग. | ६७ |
| ५ | फ | आरामबाग इस्टेट, वीर सावरकर मार्ग, ठाणे (प) दुरध्वनी क्र. २५३३२६४८, २५३३२६५७ | ३६/फ, ३७/फ, ३८/फ, ३९/फ (मु), ३९/फ (उ), ४१/फ (ठाणे), ४१/फ (वाशी), ४१/फ (भाईंदर), ४६/फ (अंब), ४६/फ (बद), ४८/फ | ७४ |

ज्या विभागात शिधावाटप दुकाने मंजूर करावयाची आहेत त्या विभागाची नावे विभागाच्या चतु:सिमा व संबंधित बाब क्रमांक याबाबतचा तपशिल दर्शविणारी यादी यापत्रकासोबत जोडली आहे. जाहिरातीतील प्रसिध्द झालेल्या विभागात शिधावाटप दुकान मंजूरीसाठी यापूर्वी कोणी अर्ज केले असल्यास ते नामंजूर झालेले आहेत असे समजण्यात यावे. शासनाने निश्चित केलेल्या अटी/शर्तीनुसार पात्र ठरणाऱ्या अर्जदारांना शिधावाटप दुकाने मंजूर करण्यात येतील.

फक्त "अ" परिमंडळ कार्यालयीन क्षेत्रातील विभागात घोषित चतु:सिमेत दुकानासाठी जागा असलेला एकही पात्र अर्जदार उपलब्ध नसल्यास किंवा पात्र नसल्यास चतु:सिमेबाहेरील परंतु कमाल ५०० मिटर अंतरापर्यंत जागा असणाऱ्या व सर्व अटी पूर्ण करणाऱ्या पात्र अर्जदाराचा शिधापत्रिकाधारकांच्या सोयीच्यादृष्टिने शिधावाटप दुकान मंजूरीसाठी विचार करण्यात येईल.

कोणतीही एक बाब किंवा बाबी कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

सदर जाहिरात www.controllerofrationing.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

क्र.निशि/दुकान/२०१२/प्र.क्र.१७०/दहा/जा.५५८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

दिनांक : ३०, नोव्हेंबर २०१३

प्रत :

१) सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित (दोन प्रती)
सदर यादीची एक प्रत कार्यालयात दर्शनी जागी जनतेच्या माहितीसाठी लावावी. तसेच अर्ज विक्री व स्विकारण्यासाठी परिमंडळ कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था करावी. अर्ज विक्री करताना ते कोणत्या विभागासाठी देण्यात येत आहेत त्याचा बाब क्रमांक अर्जावर स्पष्टपणे नमूद करावा. या जाहिरातीस जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळावी यादृष्टिने आपल्यास्तरावर प्रयत्न करावेत.

२) शिधावाटप अधिकारी, सर्व शिधावाटप कार्यालय यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित. या जाहिरातीस जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळावी यादृष्टिने आपल्यास्तरावर प्रयत्न करावेत.

३) सर्व उपनियंत्रक शिधावाटप व कार्यासन अधिकारी, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी.

४) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २१, २३, २८ व ३१, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित.

५) मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे स्विय सहाय्यक(दोन प्रती)

६) मा. मंत्री महोदयांचे खाजगी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सस्नेह सादर.

७) मा. राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सस्नेह सादर.